अनुसूचित जाती आणि अनूसूचित जमातीतील लोकांवर होणा-या अन्यायास प्रतिबंध करण्यासाठी मार्गदर्शक सूचना

# महाराष्ट्र शासन

गृह विभाग,
शासन परिपत्रक क्र. एनएचआरसी-०६१८/प्रक्र १३६/पोल-१४
दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक- २६ फेब्रुवारी, २०१९

संदर्भ :- राष्ट्रीय मानव अधिकार आयोग,नवी दिल्ली यांनी प्रकरण क्र. १२०७/१३/१२/२०१८-युसी मध्ये दिनांक २४.१२.२०१८ च्या पत्रान्वये दिलेले निर्देश.

## परिपत्रक

"तीन दलित मुलांना गावातील विहिरीत पोहल्याने नग्न करुन मारहाण झाल्याबाबत" या शिर्षकाखाली दिनांक १५.०६.२०१८ रोजीच्या इंडीयन एक्सप्रेस या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीची राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने स्वाधीकारे दखल घेतली होती. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना सदर घटनेची पुनरावृत्ती टाळण्याच्या अनुषंगाने अशा घटनांवर विशेषत: अशा संवेदनशील भागामध्ये लक्ष ठेवण्याच्या अनुषंगाने संबंधित प्राधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे निदेश दिले आहेत.

उपरोक्त नमुद निरिक्षणाअंती खालील सूचना निर्गमित करण्यांत येत आहे. सदर सूचनांचे सर्व संबंधित प्राधिकारी यांनी कार्यासक्तीने/तत्परतेने पालन करावे.

अनुसूचित जाती आणि जमातीचे प्राबल्य असणा-या क्षेत्रात कायदा-सुव्यवस्था तसेच शांतता राखण्यासंदर्भात सर्वतोपरी आवश्यक कार्यवाही संबंधित जिल्हा प्रशासनाची आहे. अनुसूचित जाती/जमातीतील लोकांवर होणा-या अन्यायास प्रतिबंध करण्यासाठी --

१. ज्या भागात ॲट्रासिटीविषयक घटना होऊ शकतात किंवा अशा घटनांची पुनरावृत्ती होवून सदर कायद्यातंर्गत गुन्हा घडण्याची धास्ती आहे अशी संवेदनशील क्षेत्रे जिल्हा प्रशासनाने निश्चित करावीत.

२. संबंधित जिल्हादंडाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त किंवा अन्य अधिकारी यांनी अशा निश्चित केलेल्या संवेदनशील क्षेत्रास भेट देऊन तेथील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घ्यावा.

३. आवश्यकतेनुसार निश्चित केलेल्या संवेदनशील क्षेत्रात अनुसूचित जाती/जमातीचे सदस्य नसलेल्या व्यक्ती,त्यांचे जवळचे नातेवाईक,नोकर,कौटुंबिक मित्र इत्यादीना देण्यात आलेले शस्त्र परवाने रद्द करुन ते शासन शस्त्रागारात जमा करावे.

४. सर्व बेकायदेशीर हत्यारे जप्त करावीत आणि बेकायदेशीर हत्यारांच्या निर्मितीस प्रतिबंध करण्यात यावा.

५. लोकांची जिवीत तसेच वित्तीय सुरक्षा सुनिश्चित करण्याकरिता अनुसूचित जाती/जमातीतील सदस्यांना आवश्यकतेनुसार शस्त्र परवाने देण्यात यावेत.

६. अनुसूचित जाती/अनुसचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम १९९५ मधील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा तसेच उपविभाग स्तरावर किंवा इतर समितींचे आवश्यकतेनुसार गठण करण्यात यावे.

७. अनुसूचित जाती/अनुसचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम १९९५ तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भात उपाययोजना सुचविण्याकरीता दक्षता आणि नियत्रंण समितीची स्थापना करावी.

८. अनुसूचित जाती/जमातीतील लोकांना त्यांचे हक्क आणि राज्य आणि केंद्र शासनाचे विविध कायदे, नियम व त्याखालील विविध योजनांतर्गत त्यांना असलेले संरक्षण इत्यादीबाबत शिक्षित करण्यासाठी जनजागृती केंद्राची स्थापना करण्यांत यावी आणि निश्चित केलेल्या संवेदनशील क्षेत्रात किंवा इतर क्षेत्रात कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.

९. जनजागृती केंद्राची स्थापना व व्यवस्था करणे, कार्यशाळांचे आयोजन करणे याकरीता आवश्यक वित्तीय तसेच इतर सहाय्य देऊन गैर-सरकारी संस्थांना (NGO) प्रोत्साहन देण्यात यावे.

१०. निश्चित केलेल्या संवदेनशील भागात आवश्यकतेनुसार विशेष पोलीस दल तैनात करण्यात यावे.

११. अनुसूचित जाती/अनुसचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम १९९५ मधील तरतुदी आणि त्या अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांसह उपरोक्त नमुद गठीत केलेल्या समित्या, तपासी अधिकारी,विशेष सरकारी वकील व इतर पोलीस अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा कायदा व सुव्यवस्थेसह दर तिमाहीस आढावा घेण्यात यावा.

१२. ॲट्रासिटीविषयक घटना घडलेल्या क्षेत्रास, तेथील जिवीत व वित्त हानीचा आढावा घेवून नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने पिडीत व्यक्ती/त्यांचे कुटूंबातील सदस्य आणि त्यांचेवर अवलंबून असलेल्या व्यक्तींची यादी तयार करण्यासाठी संबंधित जिल्हादंडाधिकारी आणि पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त भेट देतील.

१३. संबंधित पोलीस स्टेशन मध्ये प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला असल्याची तसेच संबंधित दोषींना पकडण्यासाठी उपाययोजना करण्यांत येत असल्याची संबंधित पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांनी खात्री करावी.

१४. ॲट्रासिटीची घटना घडल्यानंतर संबंधित पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त तात्काळ घटना स्थळाचे निरिक्षण करुन आवश्यकतेनुसार प्रतिबंधक उपाययोजना करतील. तसेच, घटनेची चौकशी करण्यासाठी तपासी अधिकारी नेमुन आवश्यकतेनुसार पुरेसे पोलीस बळ तैनात करतील.

१५. संबंधित जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा इतर कोणताही कार्यकारी दंडाधिकारी ॲट्रासिटीच्या घटनेतील पिडीत व त्यावर अवलंबून असलेल्या लोकांना सात दिवसाच्या कालावधीत रोख रक्कम किंवा वस्तु किंवा दोन्ही स्वरुपात मदत उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय व इतर उपाययोजना करतील. सदर मदत अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम, १९९५ सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या परिशिष्ट-एक आणि दोन मध्ये नमूद केल्याप्रमाणे

उपलब्ध करण्यात यावी. त्यामध्ये अन्न, पाणी, कपडे, निवारा, वैदयकीय मदत व इतर आवश्यक बाबींचा समावेश असावा.

१६. जिल्हादंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी,कार्यकारी दंडाधिकारी किंवा पोलीस उप अधीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला इतर कोणताही पोलीस अधिकारी त्याला माहिती मिळाल्यानंतर त्याने आवश्यकतेनुसार केलेल्या चौकशीअंती,त्याचे अधिकार क्षेत्रातील स्थानिक जागेत राहत असलेल्या किंवा अशा जागेस वारंवार भेट देण्याऱ्या अनुसूचित जाती, जमातीशी संबंधित नसलेली व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह यांचेकडून अनुसूचित जाती/अनुसचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम १९९५ अंतर्गत एखादा गुन्हा घडण्याची किंवा गुन्हा करण्याची धमकी दिल्याची त्याची खात्री झाल्यास आणि पुढील कार्यवाही करण्यास पुरेसा आधार असल्याचे मत बनल्यास असे क्षेत्र ॲट्रासिटी विषयक संवेदनशील म्हणून घोषित करुन तेथे शांतता आणि चांगले वर्तन, कायदा- सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक प्रतिबंधक कार्यवाही करील.

१७. ॲट्रॉसिटीविषयक घटनेतील पिडीतांना न्याय देण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तसेच, उपविभागीय दंडाधिकारी हे जिल्हास्तरावर तसेच उपविभाग स्तरावरील दक्षता समित्या, नियंत्रण समित्या यांच्यासमवेत नियमित बैठका आयोजित करतील. तसेच, आवश्यकतेनुसार विशेष सरकारी वकीलांची नियुक्ती करतील.

१८. अनुसूचित जाती/अनुसचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम १९९५ मधील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या भागात कार्यरत असलेल्या पोलीस अधिका-यांचे प्रशिक्षण शिबीर तसेच क्षमताबांधणी शिबीर आयोजित करण्याकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागाने त्याचे अर्थसंकल्पीय तरतुदीतून पोलीस विभागास आर्थिक सहाय्य करावे.

१९. अनुसूचित जाती/अनुसचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम १९९५ मधील तरतुदींची माहिती करुन देण्यासाठी सर्व संबंधित प्रशिक्षण संस्थांनी पोलीस अधिकारी/प्रशिक्षाणार्थी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याकरीता प्रशिक्षण सत्र आयोजित करावे.

२०. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी /कर्मचारी यांचेसाठी अनुसूचित जाती/अनुसचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम १९९५ सोबतच्या अनुसूचीतील तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भात प्रशिक्षण आयोजित करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२७१७१७३५३८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh Kumar Jain

Digitally signed by Dinesh Kumar Jain
DN: CN = Dinesh Kumar Jain, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Chief Secretary Department
Date: 2019.02.27 17:24:24 +05'30'

**(दिनेश कुमार जैन)**
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रत- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव

१. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.

२. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग , मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.

प्रत- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव
१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. सर्व पोलीस आयुक्त
४. सर्व जिल्हा दंडाधिकारी,
५. सर्व विशेष पोलीस महानिरिक्षक, (परिक्षेत्रीय)
६. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.

**Guidelines to prevent the Atrocities against Scheduled Castes and Scheduled Tribes.**

## Government of Maharashtra

**Home Department**

**Government Circular No. NHRC-0618/C.R. 136/Pol 14**

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya , Mumbai-400032
Dated- 26th February, 2019.

Ref :- Directions of Hon. National Human Right Commission, New Delhi in the case no 1207/13/12/2018/UC, vide its letter dated 24.12.2018.

## CIRCULAR

The National Human Right Commission has taken suo-motu cognizance of a news report under caption "Three Dalit boys beaten, paraded naked for swimming in village well" published in Indian Express dated 15.06.2018. Hon. Commission has directed to Chief Secretary, Government of Maharashtra to issue guidelines to concerned authorities to keep a watch on such incidents particularly in sensitive areas so that, these kinds of incidents do not recur in future.

In view of the above referred observations following instructions are being issued which have to be implemented diligently and promptly by all concerned authorities.

It is the responsibility of the District Administration to maintain utmost peace, tranquillity and public order in the areas inhabited by members of SCs and STs.

1. In order to prevent atrocities on members on SCs/STs –
   - (i) District Administration shall Identify areas, where it has reasons to believe that, atrocity may take place or there is an apprehension of reccurrence of an offence under the Act;
   - (ii) Concerned District Magistrate and Superintendent of Police/ Commissioner of Police or any other officer should visit such identified areas and review the law and order situation, therein.
   - (iii) If deemed necessary, in the identified areas, to cancel the arms licences of the persons, not being member of the Scheduled Castes or Scheduled Tribes, their near relations, servants or employees and family friends and get such arms deposited in the Government Armoury;
   - (iv) Seize all illegal fire-arms and prohibit any illegal manufacture of fire-arms;
   - (v) With a view to ensure the safety of person and property, if deemed necessary, provide arms licences to the members of the Scheduled Castes and the Scheduled Tribes;

**(vi)** Constitute District and Sub Divisional Level Committees or such number of other committees as deemed proper and necessary for assisting in the implementation of the provisions of the SC/ST (POA) Rules, 1995.

**(vii)** Set up vigilance and monitoring committee to suggest effective measures to implement the provisions of the SC/ST (POA) Rules, 1995.

**(viii)** Set-up Awareness Centres and organize Workshops in the identified areas or at some other place to educate the persons belonging to the Scheduled Castes and the Scheduled Tribes about their rights and the protection available to them under the provisions of various Central and State enactments or rules, regulations and schemes framed thereunder;

**(ix)** Encourage Non-Government Organisations for establishing and maintaining Awareness Centres and organizing workshops and provide them necessary financial and other sort of assistance;

**(x)** Deploy special police force in the identified areas;

**(xi)** At the end of every quarter, review the law and order situation, functioning of different committees, performance of Special Public Prosecutors, Investigating Officers and other Officers responsible for implementing the provisions of the Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Autrocities) Rules, 1995 and the cases registered under this Act.

**(xii)** The District Magistrate and the Superintendent of Police/Commissioner of Police shall visit the place or area where the atrocity has been committed to assess the loss of life and damage to the property and draw a list of victims, their family members and dependents entitled for relief.

**(xiii)** Superintendent of Police/Commissioner of Police shall ensure that the First Information Report is registered by concerned police station and effective measures for apprehending the accused are taken.

**(xiv)** The Superintendent of Police/Commissioner of Police, after spot inspection, shall immediately appoint an investigating officer and deploy such police force in the area and take such other preventive measures as he may deem proper and necessary.

**(xv)** The District Magistrate or the Sub-Divisional Magistrate or any other Executive Magistrate shall make necessary administrative and other arrangements and provide relief in cash or in kind or both within seven days to the victims of atrocity, their family members and dependents according to the scale as provided in Annexure-I read with Annexure-II of the Schedule annexed to Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Autrocities) Rules, 1995 and such immediate relief shall also include food, water, clothing, shelter, medical aid, transport facilities and other essential items.

**(xvi)** The District Magistrate or a Sub-Divisional Magistrate or any other Executive Magistrate or any police officer not below the rank of a Deputy Superintendent of Police may, on receiving information and

after such inquiry as he may think necessary, has reason to believe that a person or a group of persons not belonging to the Scheduled Castes or the Scheduled Tribes, residing in or frequenting any place within the local limits of his jurisdiction is likely to commit an offence or has threatened to commit any offence under Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Autrocities) Rules, 1995 and is of the opinion that there is sufficient ground for proceeding, declare such an area to be an area prone to atrocities and take necessary action for keeping the peace and good behaviour and maintenance of public order and tranquillity and may take preventive action.

**(xvii)** The District Magistrate and the Sub Divisional Magistrate shall take regular meetings of District level and Sub-Divisional level, Vigilance and Monitoring Committee, in order to give justice to the victims of atrocities in all heinous offences, Special Public Prosecutor may be appointed.

**(xviii)** Department of Social Justice and Special Assistance as well as Tribal Development Department shall assist, through their budgetary support, the Police Department in organizing training and capacity building program for officers for the implementation of this Rules.

**(xix)** All training academies shall organize training sessions for officers / men undergoing training therein on the provisions of Schedule annexed to Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Autrocities) Rules, 1995.

**(xx)** Divisional Commissioner should organize training for officers and men working under him on the implementation of the provision of Schedule annexed to Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Autrocities) Rules, 1995.

This Government resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201902271717353829. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Dinesh Kumar Jain Digitally signed by Dinesh Kumar Jain DN: CN = Dinesh Kumar Jain, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Chief Secretary Department Date: 2019.02.27 17:24:45 +05'30'

**(Dinesh kumar Jain)**
Chief Secretary, Government of Maharashtra

Copy for information and necessary action to

The Principle Secretary, Social Justice and Special Assistance Department, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai.

The Principle Secretary, Tribal Development Department, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai

Copy for information and necessary action to..

1. Director General of Police, Maharashtra State, Mumbai.
2. All Divisional Commissioners
3. All Police Commissioners
4. All District magistrates
5. All Range Special Inspector General of police.
6. All District superintendents of Police

..................